पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/३/कावि/५६/२०१६
दिनांक - २४/०२/२०१६

**विषय :- "आपले सरकार" अंतर्गत ऑनलाईन माहिती अधिकार प्रशिक्षणाबाबत......**

**संदर्भ :- परिपत्रक क्र.नासुके/१/कावि/८५/२०१६ दि. १६/०२/२०१६**

**परिपत्रक,**

महाराष्ट्र शासनातर्फे **"आपले सरकार"** पोर्टलद्वारे दि. २६ जानेवारी २०१६ पासून ऑनलाईन माहिती अधिकार प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. याद्वारे नागरिकांना महानगरपालिकेसह विविध शासकीय कार्यालयांशी संबंधित ऑनलाईन माहिती अधिकार अर्ज व अपिल दाखल करता येणार असून संबंधित विभागांकडील प्राप्त प्रकरणे, प्रलंबित प्रकरणे, निकाली प्रकरणे व मुदतबाह्य झालेली प्रकरणे याचा स्वतंत्र डॅशबोर्ड मा. मुख्यमंत्री कार्यालयामध्ये आढावा घेणेकामी तयार करणेत आलेला आहे.

**"आपले सरकार"** अंतर्गत माहिती अधिकार प्रणालीद्वारे करावयाच्या ऑनलाईन कार्यपध्दती-बाबत दिनांक २/३/२०१६ रोजी सकाळी / ~~दुपारी~~ १०.३० वा. ऑटो क्लस्टर, मुंबई-पुणे रोड, चिंचवड, पुणे-४११०१९ येथे प्रशिक्षण आयोजित केले असून सदर प्रशिक्षणास माहिती अधिकारी, कॉम्प्युटर ऑपरेटर व माहिती अधिकार विषयक कामकाज करणारे संबंधित कर्मचारी यांनी उपस्थित राहावे.

माहिती अधिकार विषयक कामकाज करणारे अधिकारी / कर्मचारी यांना सदर प्रणालीद्वारे नियमीत कामकाज करणे यापुढे बंधनकारक राहणार असून संगणक प्रणालीविषयक तांत्रीक अडचणी असल्यास आपल्या विभागातील कॉम्प्युटर ऑपरेटर अथवा माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधावा.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रति - सर्व विभाग

--------------------------------

प्रत :- माहिती व जनसंपर्क विभाग
२/- चहापान व्यवस्थेकामी